# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक २२.१.२००७ रोजी संपन्न झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

सोमवार **दिनांक २२ जानेवारी २००७** रोजी मा.महापौर डॉ.भागवत किशनराव कराड यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील ''प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह ''येथे दुपारी १२.१५ वाजता ''वंदेमातरम्''या गिताने सुरू झाली.सभेला मा.आयुक्त तसेच नगरसचिव यांचेसह संबधीत अधिकारी व खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

०१. स.स.सौ.लता श्रीनिवास दलाल
०२. स.स.श्री.रेणुकादास दत्तोपंत वैद्य
०३. स.स.श्री.संतोष सर्जेराव खेंडके पाटील
०४. स.स.श्री.अ.साजेद अ.सत्तार
०५. स.स.श्री.बम्हणे पुनमचंद सोनाजी
०६. स.स.श्री.सुरे सिताराम इसराम
०७. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
०८. स.स.श्री.गवळी रविकांत काशिनाथ
०९. स.स.श्री.नाहदी नासेर महमंद याहीया
१०. स.स.श्री.पांडे विनायक प्रभाकर
११. स.स.श्री.दाभाडे मिलींद यशवंत
१२. स.स.श्री.ठाकुर पुरूषोत्तम रघुविरसिंग
१३. स.स.श्री.खान सलीम खान यासीन
१४. स.स.श्रीमती आशन्ना लक्ष्मी शंकर
१५. स.स.श्री.जगताप संजय उत्तमराव
१६. स.स.सौ.मसरद बेगम शरफोद्दीन
१७. स.स.श्री.गायकवाड दिलीप नारायण
१८. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१९. स.स.सौ.जोशी रजनी रमेश
२०. स.स.श्री.महेश शिवाजीराव माळवतकर
२१. स.स.श्री.अत्तरदे प्रकाश सुका
२२. स.स.श्री.जैस्वाल अनिल जुगललाल
२३. स.स.सौ.रगडे सुशिला भगवान
२४. स.स.श्रीमती शिंदे मिराबाई रामराव
२५. स.स.सौ.पाटील दिपाली सुनिल
२६. स.स.श्री.काशिनाथ हरीभाऊ कोकाटे

२७. स.स.सौ.खान अजरा जबीन मसुद
२८. स.स.सौ.खान मेहेरून्नीसा खान हमीद
२९. स.स.श्री.मो.जावेद मो.इसाक
३०. स.स.सौ.मिटकर शोभा हरीश्चंद्र
३१. स.स.श्री.खान जावेद हसन कासीम हसन
३२. स.स.श्री.किशनचंद लेखराज तनवाणी
३३. स.स.श्री.स.खुसरो बुऱ्हानोद्दीन
३४. स.स.श्री.अ.रशिद खान (मामु) हमीद खान
३५. स.स.श्री.रिडलॉन संजु सुग्रीव
३६. स.स.सौ.सिध्द वीणा गजेंद्र
३७. स.स.सौ.कुरैशी नजमा बेगम युनूस
३८. स.स.श्री.खान मुजीब मीर आलम खान
३९. स.स.श्री.शेख इब्राहीम शेख इमाम
४०. स.स.श्री.हाजी शेरखान अ.रहेमान
४१. स.स.सौ.राऊत छाया विलास
४२. स.स.श्री.पाथ्रीकर दत्ताभाऊ अण्णासाहेब
४३. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
४४. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
४५. स.स.श्री.अमोदी अबुबकर बिन सईद
४६. स.स.सौ.शेख शमशाद बेगम शेख हफीज
४७. स.स.श्री.जेजुरकर संतोष सुधाकरराव
४८. स.स.सौ.पोळ सरला सखाराम
४९. स.स.श्री.कटकटे सतीष विश्वनाथ
५०. स.स.सौ.बोरामणीकर कला सुरेश
५१. स.स.सौ.मंगला प्रकाश गायकवाड
५२. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
५३. स.स.सौ.रेखा कैलास काथार
५४. स.स.श्री.गांगे रविंद्र लक्ष्मण
५५. स.स.सौ.पाटणी हर्षमाला विजयकुमार
५६. स.स.श्रीमती डॉ.बिनवडे आशा उत्तम
५७. स.स.श्री.खुडे विजय किसन
५८. स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
५९. स.स.श्री.शिंदे दामोधर माधवराव
६०. स.स.सौ.ससाणे सरीता अशोक
६१. स.स.श्री.भगवान (बापु) देविदासराव घडमोडे
६२. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
६३. स.स.सौ.शिंदे पुष्पा बाळु

६४. स.स.सौ.वाघमारे पार्वताबाई विजय
६५. स.स.श्री.विसपुते शंशाक दामोधर
६६. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
६७. स.स.सौ.कोंडेकर अंजली दिलीप
६८. स.स.श्री.जोशी संजय रामदास
६९. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
७०. स.स.श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
७१. स.स.श्री.मोरे कचरू विश्वनाथ
७२. स.स.श्री.संजय पांडुरंग शिरसाट
७३. स.स.सौ.जैन अल्पा विकास
७४. स.स.श्री.बारवाल गजानन रामकिसन
७५. स.स.सौ.मोमीन सफीया फिरदोस अय्युब खान
७६. स.स.सौ.घोडेले अनिता नंदकुमार

**नामनिर्देशित पालिका सदस्य**

०१. स.स.श्री.राजेश गुलाबचंद व्यास

श्री.संतोष खेंडके :महापालिका अस्थापनेवर दै.वेतनावर कार्यरत असलेल्या स्व.सौ.रंजना वैष्णव यांचे अल्पशा आजाराने नुकतेच निधन झालेले आहे त्यांना श्रध्दाजंली अर्पण करावी.

श्री.मुजीब खान : यास माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर : ठिक आहे सर्वांनी श्रध्दाजंलीसाठी उभे रहावे.

याचवेळी स्व.रंजना वैष्णव यांना सभागृहातर्फे दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.

**विषय क्र. ७०० :**

सर्वसाधारण सभेत ठरलेल्या व स्थायी समितीच्या सदस्याने (५ सदस्य) मागणी केल्यानुसार मालमत्ता कर व पाणीपट्टी वसूली वाढीसाठी चर्चा करणे.

**संवाद :**

श्री.मुजीब खान : सन २००५-०६ मध्ये किती टक्के पाणीपट्टी तसेच मालमत्ता कराची वसूली झालेली आहे त्यानंतर वसूली वाढविण्यासाठी स.सदस्य आपआपल्या भावना मांडतील.

श्री.महेश माळवतकर : वार्ड कार्यालयनिहाय मागिल वर्षी व या वर्षाची वसूली किती टक्के झालेली आहे.

मा.महापौर : मालमत्ता कर वसूली संदर्भात अगोदर माहिती घेतली जाईल. त्यानंतर स.सदस्यांनी वसूली जास्तीत जास्त होण्यासाठी आपआपल्या सूचना कराव्यात.

कर मु.नि.व संकलक : सन २००६-०७ या वर्षामध्ये प्रशासनाने ३१.४० कोटी उद्दिष्ठ ठेवलेले होते. सर्वसाधारण सभेने ४१.५० कोटी मालमत्ता कराचे उद्दिष्ठ दिलेले होते. सन २००६-०७ या वर्षाची चालू मागणी १३.५३ कोटी आहे. थकबाकी २२.३२ कोटी.अशी ३५.८३ कोटीची एकूण मागणी आहे. ११० प्रकरणे मा. न्यायालयात प्रलंबीत असून त्यापोटी ५.६१ कोटी रक्कम गुंतलेली आहे. जिल्हा व सत्रन्यायाधिश श्री.जगताप साहेब यांची भेट घेतली व ४ फेब्रुवारी रोजी

लोकअदालत ठेवण्यासाठी प्रयत्न केलेले होते. परंतू न्यायालयाचे बांधकाम बाकी आहे. त्यामूळे आणखी १५ दिवसाची मूदतवाढ मागवून घेत आहोत. २० तारखेपर्यत लोकअदालत होईल व ही सर्व प्रकरणे निकाली काढण्याचे प्रयत्न राहणार आहे. यातून किमान ३ कोटी तरी उत्पन्न महानगरपालिकेस मिळेल.एमआयडीसी चिकलठाणा येथे २४७ कारखाने बंद आहे. त्यांचेकडे २.३५ कोटी रक्कम थकबाकी आहे. १९८७ साली महानगरपालिकेत लोकअदालत घेतलेले होते. चिकलठाणा एमआयडीसी मध्ये थकबाकी ही २.६७ कोटी तर चालू मागणी १.६४ कोटीची आहे. जी ३५.८३ कोटी एकूण डिमांड आहे त्यापैकी न्यायालयीन प्रकरणे व एमआयडीसी चिकलठाणा येथील ८.कोटी रक्क्म वसूल होणे अवघड झालेले आहे. कंपनीचे जे मालक आहे ते सध्या येथे नाही.

श्री.संजय सिरसाट : जेव्हा एखादी कंपनी बंद होते किंवा संबधीत मालक कंपनी विक्री करून निघून जातो त्याची माहिती प्रशासनाकडे असते काय?२४७ कारखान्या पैकी कितीकडून वसूली आतापर्यत केलेली आहे. किती लोकांनी कारखाने विकत घेतलेले आहे.

कर मुल्य निर्धा.व.संकलक: प्रशासनातर्फे तसा पत्र व्यवहार चालू आहे. एक एक माहिती मिळत असून त्याप्रमाणे वसूली करण्याचे काम चालू आहे. नवीन मालकाकडून वसूली करीत आहोत.गेल्यावर्षी जवळपास २ कोटी एमआयडीसी भागातून वसूल केलेले होते.सन २००४-०५ मध्ये १.१९ कोटी सन २००५-०६ मध्ये २.०२ कोटी तर सन २००६-०७ मध्ये आजपर्यत १.१० कोटी वसूल केलेले आहे. बंद कारखान्यामूळे वसूली करण्यास अडचण येते.

मा..महापौर : वार्ड कार्यालय निहाय वसुलीची माहिती देण्यात यावी.

कर मुल्य निर्धा. व संकलक: वार्ड अ कार्यालयाची चालू मागणी १.८३ कोटी थकबाकी २.०३, एकूण मागणी ३.८६ कोटी वसूली १.१६ कोटी झालेली आहे.वार्ड कार्यालय ब ची चालू मागणी १.५६ कोटी थकबाकी २.८४ एकूण मागणी ४.४०,वसूली १.३६ कोटी, वार्ड क कार्यालयाची वसूली चालू मागणी १.४५ थकंबाकी २.१८ एकूण मागणी ३.८३ कोटी असून वसूली ६५.८४ लक्ष वार्ड ड कार्यालयाची चालू मागणी ३.४० थकबाकी ५.२३ एकूण मागणी ८.६३ कोटी, वसूली ३.०४ वार्ड ई कार्यालयाची चालू मागणी १.१५ कोटी , थकबाकी ३.२७ कोटी एकूण मागणी ४..४२ कोटी वसूली ५६.६२ लक्ष वार्ड फ कार्यालयाची वसूली चालू मागणी ४.१४ थकबाकी ६.७७ कोटी एकूण मागणी १०.९१ कोटी वसूली अशी एकूण ९.२४ कोटी इतकी ही दिं. १९.१.०७ पर्यत झालेली आहे.मागिल वर्षीही जानेवारी अखेर ९.२५ कोटी वसूली झाली होती.

श्री.मुजीब खान : ज्या मालमत्तेला कर लागलेला नव्हता त्यांचेकडून वसूली केली त्यामूळे मागिल वर्षाच्या बरोबरीने वसूली झालेली आहे. प्रशासनाने जातीने लक्ष देवून वसूली केली असती तर १५ ते १६ कोटीपर्यत गेले असती. स्पेक या संस्थेला सर्वेचे काम दिलेले आहे तो होत नाही म्हणून वसूली होत नाही. यामूळे महापालिकेचे मोठया प्रमाणात उत्पन्न बुडत आहे. स्पेक या संस्थेने लोकांना नोटीसेस दिल्या स्पेकच्या

लोकांनी सर्वे केला तो बाहेरून भिंत बघून कर लावलेला आहे. घराचा अंतर्गत जो भाग असतो त्यावर कर आकारला जातो. परंतू तसे झालेले नाही. या संदर्भात अनेक बैठकीमध्ये चर्चा झालेली होती. त्यावर आयुक्तांनी असे म्हटले होते की वार्ड अधिकारी हे वार्ड कार्यालयात बसून तपासणी करतील. काही भागात अधिकाऱ्यानी भेट दिली. बील्टअप येरीया जेव्हढा आहे त्यानूसार हा टॅक्स योग्य नाही असे निदर्शनास आले. व अनेक वेळा हेरींगसाठी नागरीकांना बोलविण्यात आले. पहिला एका घराचा कर ३३४ होता स्पेकने १८३६ दिला हेरींग झाली त्यानंतर पुन्हा बदल झाला. माझ्या वार्डातील काही भाग अधिकाऱ्याना दाखविला तो जुना गावठाण मध्ये येतो. कर जास्त येणार नाही म्हणून म्हटले परंतू दिवसेंदिवस कराची रक्कम वाढत जात असून स्पेक व प्रशासनाची मोठी चूक झालेली आहे. त्यावर कूणाचेही नियंत्रण नाही.८० टक्के लोक जास्तीचा कर आकारला म्हणून कर भरण्यास तयार नाही.वार्डातील अनेक लोकांच्या जास्त टॅक्स आकरल्या बद्दल तक्रारी आहे. त्यासाठी महानगरपालिकेने सर्वे करावा. कमी जास्त कर आकारणी करणेची जबाबदारी प्रशासनाची आहे परंतू लोकांना मोठा त्रास होत आहे. मस्जीद व मंदीरांना कर आकारला जाणार नाही म्हणून निर्णय घेतला. परंतू चार चार नोटीसा पाठविल्या जात आहे.नियमानूसार बरोबर टॅक्स आकारल्यास सर्व जनता रांगेत उभे राहून कर भरतील अशी खात्री आहे.

श्री.गजानन रामकिसन बारवाल : माझ्या वार्डात महादेव मंदीर, रेणूका माता मंदीरास टॅक्स आकारणी बाबत नोटीसेस दिलेल्या आहे.संस्थानला. नोटीस देता येते का कर वसूल करू शकतो का, केंव्हापासून देण्यास सुरूवात केलेली आहे.

मा. महापौर : संस्थान असेल ट्रस्ट असेल तर त्यास कर लावता येतो. मंदीरला नाही.

श्री.संजय सिरसाट : धार्मीक संस्थान असेल तर कर माफ करण्याची प्रोव्हीजन आहे.

मा. महापौर : एक पेक्षा जास्त नोटीसेस का दिल्या जातात याचा खूलासा व्हावा.

श्री. देसरडा प्रशांत : स्पेक या संस्थेला नेमके काय काम दिले होते व काय काम करायचे होते.

श्री.संजय सिरसाट : गेल्या वर्षाची डिमांड किती होती. स्पेकने सर्वे केल्यानंतर जे रेकॉर्डवर घरे नव्हती अशा घरामूळे किती डिमांड वाढलेली आहे. चालू वर्षाची मागणी किती.

श्री.अमोदी अबुबकर : मस्जीद ,गुरूद्धार किंवा मंदीर यास मालमत्ता कर आकारला जातो काय ?

करमुल्य निर्धा.व संकलक: मस्जीद,मंदीर साठी टॅक्स आकारला जात नाही जर बाहेर कमर्शियल कॉम्प्लेक्स बांधलेले असेल त्यास टॅक्स आकारला जातो.

श्री.मुजीब खान : अधिकारी चूकीचे उत्तर देतात. मस्जीद मंदीर बाजूला बाहेर काहीही बांधकाम झालेले नसतांना टॅक्सची नोटीस दिलेली आहे.जागा कमी असते त्यांनाच वापरण्यासाठी कमी पडते दुकाने कॉम्प्लेक्स कशासाठी काढतील.

श्री.संजय सिरसाट : रेणुका माता मंदीर जवळ पाणी पूरवठा अधिकारी राहतात तेथे कमर्शियल बांधकाम झालेले आहे का त्यांचेकडून खुलासा घ्यावा.

श्री.सय्यद खुसरो : जर एखादया ट्रस्टची जागा असेल किंवा लिजवर जागा दिलेली असेल त्या जागेवर मंदीर मस्जीद चे बांधकाम कुणी करून दिले असेल तर त्यास टॅक्स लावता येत नाही सर्वोच्च न्यायालयाचे आदेश आहे.

करमुल्य निर्धा.व संकलक: मस्जीद मंदीरला टॅक्स लावला जात नाही रेकॉर्डवर नोंद असणे आवश्यक आहे.

श्री.संजय जोशी : असे असतांना वार्ड अधिकारी यांनी कर आकारणीची नोटीस दिली. ती चूकीची आहे का?

श्री.भगवान घडमोडे : नोटीस महानगरपालिकेने दिली की स्पेक या संस्थेने दिली याचाही खूलासा करावा.

वार्ड अधिकारी - अ : व्यवस्थापक महादेव मंदीर माणिक पुजारी वैजनाथ यांना जुना टॅक्स लागलेला आहे मंदीराच्या बाजूला जे पुजारी राहतात त्यांना कदाचित टॅक्स लागलेला असेल.

श्री.संजय सिरसाट : रेणूका माता मंदीर या नावाने टॅक्स लागलेला आहे. पुजारी यांना टॅक्स दिला त्याबद्दल बोलत नाही.

श्री.मुजीब खान : मस्जीद व मंदीर यास टॅक्स लावायचा की नाही या सभागृहाने काय निर्णय घेतलेला होता ते सभागृहासमोर आणावे.त्याची अमलबजावणी अधिकारी यांनी का केलेली नाही. मालमत्ता कराच्यासंदर्भात मी सन २००० मध्ये ही व आठ दिवसापूर्वीही मा.आयुक्त यांना पत्र दिले परतुं कोणतेही उत्तर मिळत नाही.कराच्या बाबतीत प्रत्येक घरोघरी जावून लोकांना त्रास दिला जातो.

श्री.संतोष खेंडके : संस्थांनचे पूजारी यांना नोटीस महानगरपालिकेने दिली की स्पेक या संस्थेने दिली याचा प्रथम खूलासा व्हावा.

मा. महापौर : नोटीस कूणी दिली याचा खूलासा करावा.तसेच एका मालमत्तेस एक पेक्षा जास्त नोटीसेस दिलेल्या आहे हया कूणी दिल्या.

वार्ड अधिकारी-अ : स्पेक संस्थेकडून मंदीरास नोटीस गेलेली आहे महापालिकेने दिलेली नाही.एका मालमत्तेस एकच नोटीस दिलेली आहे.

सौ.खॉन अजरा जबीन : स्पेक एजन्सीकडे नॉन टेक्नीकल कर्मचारी सर्वेसाठी आहे. वाटेल त्या पध्दतीने जास्तीचा टॅक्स आकारणी केलेली आहे.तसे पुर्वीचा जो टॅक्स आहे तो अगोदर वसूल करण्याची कार्यवाही करावी. टॅक्स आकारणी बरोबर होते की नाही याकडे प्रशासनाचे लक्ष नाही. त्यामूळे अनेक अडचणी निर्माण होवून उत्पन्न घटत आहे.

श्री.संजय जोशी : नोटीसेस कोण देतात याचा ताळमेळ नाही.महापालिकेने नोटीस दयायची व स्पेकनेही नोटीसेस दयायच्या मोठी थकबाकी दाखवली जाते वसूली होत नाही म्हणून विकास कामे होत नाही.

श्री.भगवान घडमोडे : एकाच घराला चार व्यक्तीच्या नावाने टॅक्स दिला जातो एजन्सीमध्ये व महापालिकेमध्ये समन्वय नाही. एक भाडेकरू व्यक्ती यांनी त्यांचे नावाने कराची नोटीस आली त्या अधारे मागिल तारखेचा स्टॅम्पवर त्यांनी घर स्वत:च्या नावावर करून घेतले व घर मालक किराया मागणीसाठी गेले असता मी घराचा मालक आहे म्हणून सांगण्यात आले. असा प्रकार यामूळे होत आहे.

श्री.दिलीप गायकवाड : अपना बाजार येथे २२५ दुकाने आहे. १९९५ पासून माझ्या माहिती प्रमाणे ९० दुकानांना टॅक्स लागलेला आहे.उर्वरीत दुकानास टॅक्स का आकारलेला नाही खूलासा घेण्यात यावा.

श्री.रविंद्र गांगे : २० वर्षापूर्वीचे माझे घर असतांना बालाजी अल्यूमिनियम ॲण्ड ग्लास या नावाने मला नोटीस आलेली आहे.

श्री.प्रशांत देसरडा : ज्या मालमत्ता रेकॉर्डवर उपलब्ध नाही अशा मालमत्तेचा शोध करून कर आकारणी बाबात सुसूत्रीकरण करून दयावे म्हणून स्पेकला काम दिले होते. या देशातील मिलेट्रीचा सर्वे करणेचे काम ही एजन्सी करते म्हणून चांगली एजन्सी आहे कराच्या माध्यमातून महापालिकेस उत्पन्न वाढेल म्हणून काम देण्यात आले.या एजन्सीचे काम अशा पध्दतीने चालू आहे की जेवढे पेमेन्ट महापालिका देणार आहे त्यापेक्षाही जास्त भ्रष्टाचार या एजन्सीकडून होत आहे. जास्त रक्मेची नोटीस ही एजन्सी देते संबधीत व्यक्ती तडजोडीसाठी त्यांचेकडे जाते व १६ हजाराची नोटीस आठ हजारापर्यत येते.ज्या जुन्या मालमत्ता होत्या त्यांना टॅक्स लागलेला होता. अशा लोकांना वाढीव दराने स्पेक मार्फत नोटीस देण्याची गरज नव्हती. माझ्या वार्डात प्रत्येक घरांना वाढीव कराची नोटीस दिलेली आहे. महानगरपालिकेकडे ज्या जुन्या संचिका होत्या त्या घेवून त्याचे मेजरमेंन्ट घेवून नवीन दरानूसार सर्वांना नोटीस दिल्या गेल्यात्यांचेकडे असलेला कर्मचारी वर्ग हा नॉन टेक्नीकल असून लोकांनी हरीशमेंन्ट करून महानगरपालिकेचे नाव बदनाम केले आहे. चांगले काम करीत आहे म्हणून सिडकोच्या सर्वेचे काम या एजन्सीला दिले आहे.आतापर्यत किती प्रकरणात सुनावणी झाली व दिलेल्या नोटीसेस उत्तर स्पेकने दिलेले आहे. मुळ स्पेक एजन्सी ही दुसरी असेल व त्यांचे नावावर ही दुसरीच स्पेक एजन्सी काम करीत आहे असा माझा संशय आहे. एका नागरीकांना झोन कार्यालयात २० वेळेस जावे लागते. स्पेक एजन्सीला नेमके काय काम दिले होते याचा खूलासा करावा.

श्री.अ.रशिद खान (मामू): काम देतांना ही एजन्सी चांगली म्हणून मंजूरी दिली. काम करणारे लोक टेक्नीकल की नॉन टेक्नीकल होते. अनेक लोक त्यांचे काम सोडून गेले. मेडीकल कॉलेजच्या जागेवर दोन घरे झाले. तेथील बाथरूम व डब्ल्यूसीला टॅक्स आकारला पाहणी केली तर तेथे काही नव्हते रद्य केले. ज्यांनी टॅक्स लावला होता ते नोकरी सोडून गेले. जे लोक काम करीत आहे १० ते १२ वीत शिकणारे मूले आहे त्यांना कोणतेही टेक्नीकल ज्ञान नाही. वार्ड अधिकारी यांचे नियत्रणांखाली त्यांचे कर्मचाऱ्यानी काम करावयास पाहिजे.एजन्सी चागंली असेल परंतू काम करणारे बरोबर नाही. भाडेकरूच्या नावाने कर आकारला जातो. त्यांनीच नाव दाखवले म्हणून टॅक्स आकारला असे सांगण्यात येते. हे बरोबर नाही. खुल्या जागेवर इमारत झाली परंतू आजही ओपनस्पेसचा टॅक्स वसूल होतो. ज्यांनी ते घेतले त्यांनी कमी घर दाखवून कमी टॅक्स लावून घेतला, घेणारा व देणारे यांचे दोघांचे नावाने घर असून बेनामी जागा आहे तीही तपासावी लागेल.दोघांच्या नावाने टॅक्स आकारला झोन अंतर्गत हे काम ठेवले तर योग्य रितीने काम होईल. झोन अधिकारी यांनाही माहिती होईल. स्पेक कर्मचारी झोन अधिकारी यांचे अंतर्गत काम करीत नाही. एका घरास १२००० रू. टॅक्स आकारला निदर्शनास आणून दिले तेंव्हा चूक झाली म्हणून एकाच्या नावाने १२०० तर दुसऱ्याच्या नावे ८००

रू.करून देण्यात आले अशा मोठया चूका होत आहे. बेनामी मालमत्तेचा सर्वे करावा.

श्री.विनायक पांडे : स्पेक या एजन्सीकडे मालमत्ता शोधणे की जून्या मालमत्तेस टॅक्स आकारणीचे काम दिलेले होते. माझ्या वार्डात विद्युत कॉलनी आणि दत्तनगर नावाने दोन गृह निर्माण संस्था४० वर्षापूवीच्या असून ७८ घरे आहे अनधिकृत बांधकाम आहे म्हणून जास्त टॅक्स आकारणीच्या नोटीसेस दिलेल्या आहे. तेथील नागरीकांनी तक्रार दाखल केलेली आहे. त्यांची सुनावणी घेवून दोन तीन महिने झाले कोणताही निर्णय अदयाप घेतलेला नाही.दोघे भाऊ असतील तर त्या दोघांच्याही नावाने नोटीसेस दिलेल्या आहे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय: जेथे मंदीर मस्जीदची मालमत्ता आहे तेथे पूजारी पेशइमाम राहणार आहे. त्यांना काही उत्पन्न मिळत नाही. त्यामूळे टॅक्स लावण्याची गरज नाही. ज्या नोटीसेस स्पेकने दिलेल्या आहे त्या बाबतीत अगोदर माहिती महानगरपालिकेकडेदेवून प्रशासनाने नोटीसेस दयायला पाहिजे होत्या तसे झाले नाही. कोठेकोठे टॅक्स लावयचा आहे. कोणत्या मालमत्तेचा किती टॅक्स येत आहे किती मालमत्ता आहे कितींना कर आकारणी झालेली नाही हे या संस्थेचे काम होते. दोन तीन नोटीसेस देवून पैसे घेवून टॅक्स कमी करीत आहे. एनआर व्ही आपण बदलू शकत नाही. जे घर जुने आहे त्याचा टॅक्स वाढवू शकत नाही. लोकाना तीन तीन नोटीसेस देवून त्यांना त्रास सहन करावा लागतो. कूठे जायचे कूणाला भेटायचे माहिती नाही. पुर्वी जुन्या टॅक्सच्या नोटीसवर घराच्या नकाशासह टॅक्स येत असे. परंतू आता ढोबळ पणे रक्कम टाकून दिली जाते त्यामूळे असुशिक्षित लोकांना काहीही कळत नाही. त्यामूळे लोक टॅक्स भरणा करीत नाही. त्यासाठी स्पेकने सर्वे केला जो वाढून कर दिला तो रद्य करावा व जो पुर्वीचा टॅक्स होता त्याप्रमाणे वसूली करण्याचे आदेशीत करावे.या बाबत महापालिकेचे अधिकारी बसून हेरींग घेतील व`त्या त्या भागातील नागरीकांचे कराच्या बाबतीत असलेल्या तक्रारीने निराकरण करतील.

श्री.महेश माळवतकर : वसूली झाली नाही तर वार्ड अधिकारी यांना जबाबदार धरले जाते. स्पेकने नोटीसेस दिल्या परंतू त्यांना नोटीस देण्याचा अधिकार दिलेला होता का. प्रशासनाने ३५ कोटीचे दिले सर्वसाधारण सभेने ४१ कोटीचे उद्दिष्ठ दिले.मागिल वर्षी ९ कोटी वसूली झाली या वर्षीही ९ कोटीपर्यत गेले ३५ कोटीतून ९ कोटी वसूल केले,आठ कोटी कोर्ट प्रकरण तसेच एमआयडीसी भागातील बाकी आहे उर्वरीत रक्कम वसूल करण्या बाबत प्रशासनाने गांभीर्य का घेतलेले नाही. आपलीच पाठ प्रशासन थोपटून घेत आहे .निधी उपलब्ध नाही म्हणून वार्डात विकास कामे होत नाही.लेखा विभागात संचिका थांबून राहतात.ग़रीबाचे अतिक्रमण तात्काळ काढले जाते परंतू मोठया बिल्डरांचे काढले जात नाही. २६ कोटीची वसूली करण्यासाठी प्रशासन प्रयत्न करणार की नाही. जकात खाजगीकरण झाले तेथील कर्मचारी वसूलीसाठी दिले तर वसूली वाढेल या अर्थाने ते कर्मचारी वसूलीसाठी दिले जास्तीचे कर्मचारी मालमत्ता कर व पाणीपट्टी वसूलीसाठी दिले तर किती प्रमाणात वसूली ही जास्त झालेली आहे याचा खूलासा देण्याची गरज

आहे. जे कंपन्या बंद पडल्या त्या मालकाने पैसे वसूल केले आहे. त्यांचे कडून थकीत रक्कम संपूर्ण वसूली करावी. गरीब लोकांचे नळ कनेक्शन तात्काळ तोडले जाते परंतू मोठयाचे नळ कनेक्शन काढले जात नाही. वसूलीही करीत नाही. वसूली करणार नाही. पून्हा कोर्ट प्रकरण आहे म्हणून वसूली झाली नाही म्हणून सांगणार चार चार महिने संचिका बजेट नसते म्हणून मंजूरी होत नाही. वार्डातील नागरीकांना आम्ही काम होणार म्हणून आश्वासन देतो परंतू उत्पन्नच नाही तर कामे होत नाही. यास कोण जबाबदार असा प्रश्न पडतो. एजन्सी नोटीसा देते. करयोग्य मुल्य आकारणीचे अधिकार एजन्सीला कोणी दिले. त्यांना तसे अधिकार आहे काय संबधीत एजन्सी ही त्या त्या झोन कार्यालय अंतर्गत काम करेल. कर जास्तीचा दयायचा व नंतर एजन्सी परस्पर कमी करून देते हे योग्य नाही. याचे काही पूरावे सदस्य आपल्याकडे देवू शकतात. हे जर बंद करायचे असेल तर संबधीत एजन्सीवर कडक कार्यवाही केली पाहिजे. नुसते बजेट फुगवून देवून चालणार नाही. तर प्रत्यक्षात वसूली किती होते यावर विचार सर्वांनी केला पाहिजे.

श्रीमती मेहरून्नीसा खान : स्पेक यासंस्थेला दिलेला ठेका रद्य करावा महानगरपालिकेच्या अधिकाऱ्याकडून पून्हा संर्वेचे काम करून घेण्यात यावे. एकाच मालमत्तेला दोन दोन नोटीसेस दिलेल्या आहे. ज्यांना २०० रू. टॅक्स होता त्यांना १० हजार पर्यत नोटीसेस दिलेल्या आहेत. स्पेकला जे बील दिले ते परत घ्यावे ठेका रद्य करावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : ठेका देण्यात आला त्यावेळी स्पेककडे तांत्रिक कर्मचारी सर्वेसाठी असतील असा निर्णय झाला होता.परंतु एका ठिकाणी बसून १० वी १२ वीत असलेले मूलाकडून सर्वेचे काम झाले.वाटेल तेवढा टॅक्स आकारणी झाली. अटी शर्तीनूसार काम केलेले नाही काम योग्य रितीनेहोते किंवा नाही याकडे प्रशासनाचे लक्ष नाही. तसे न होता त्यांना नूसते बील अदा करण्यात आले.जो पर्यत ॲसीसमेंन्ट बरोबर होत नाही तो पर्यत एजन्सीला पूढील बील देण्यात येवू नये.

श्री.कचरू मोरे : झोपडपट्‌टी मध्ये अनधिकृत बांधकामासाठी अतिरिक्त जमिनीचा कर आकारणी करण्यात येवू नये.घरे मातीची झालेली असून वरच्या बाजूने प्लास्टर केलेले आहे. महानगरपालिकेच्या मालकीचे दुकाने भाडेने ज्यांनी घेतले त्यांचे नावाने कर आकारणी केलेली आहे. १० वी १२ वी पास असलेले मूलांनी सर्वे केलेला आहे. ज्यांनी पैसे दिले त्यांना कमी कर आकारणी केलेली आहे ज्यांनी काही दिले नाही तर त्यांना अवाढव्य कर आकारणी केलेली आहे.स्पेकने केलेला सर्वे ग्राहय धरू नये.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर :वार्डवाईज माहिती आपल्याकडे आहे काय तसेच संबधीत एजन्सीला नोटीस देण्याचा अधिकार दिलेले आहे काय याचाही खूलासा करण्यात यावा.ज्या मालमत्ता रेकार्डवर नाही त्याचा सर्वे करण्यासाठी स्पेकला काम दिलेले आहे.ज्या जुन्या मालमत्ता आहे त्यांना जास्तीचा मालमत्ता कर वाढवून देण्यासाठी काम दिलेले होते काय याचाही खूलासा करावा.मोठमोठे बिल्डर यांचे इमारतीला अगोदर टॅक्स लावण्यात यावा त्यानंतर झोपपट्‌टी भागातील विचार करावा.

श्री.संजय जोशी : स्पेक एजन्सीला काम करण्यासाठी कार्यालय तसेच तेथे सर्व सूविधा उपलब्ध करून दिल्या २५ ते ५० संगणक चालू आहे. किमान १००० रू. लाईट बील येत असेल.या एजन्सीला पाठीशी घालण्याचे काम प्रशासन करीत आहे.वसूली ही दोन वेगवेगळ्या पध्दतीने होत आहे वार्ड कार्यालयाचे कर्मचारी मालमत्ता कर तर वार्ड अभियंता यांचे कर्मचारी पाणीपट्टीचे वसूली करतात दोन्ही वसूली ही एकाच व्यक्तीने एकत्रित केली तर महानगरपालिकेचा यात फायदा आहे. जकात कर्मचारी वसूलीसाठी देवून किती टक्के वसूलीमध्ये वाढ झालेली आहे वसुली होत नाही म्हणून वार्डात कामे होत नाही प्रशासन व स. सदस्यांमध्ये वाद निर्माण होतात. नागरीकांच्या तक्रारी ऐकाव्या लागतात. झोन अधिकारी हे जागेवर बसतील व ज्या तक्रारी असतील त्या सोडविल्या जातील असे मा. आयुक्तांनी म्हटले होते परंतू त्यातून काही निष्पन्न झालेले नाही.नागरीकांना सुनावणीसाठी बोलविले जाते परंतू तेथे झोन अधिकारीच हजर राहत नाही याचा अर्थ जनतेच्या भावनाशी प्रशासन खेळ करते हे योग्य नाही.झोन मध्ये गेलो असता अंदाजपत्रक का केले नाही तर जे.ई वसूलीसाठी गेलेले आहे असे कारण दाखविले जाते. त्यासाठी पाणीपट्टी व मालमत्ता कराचे वसूलीकडे प्रशासनाने लक्ष दयावे.

श्रीमती कला बोरामणीकर: स्पेक कंपनीला कोणते काम दिले होते व काय काम केलेले आहे. त्याचा अहवाल या सभेत ठेवण्यात यावा.

श्री.सिताराम सुरे : माझ्या वार्डात वसूली जास्त होवू शकते व त्यातून विकास कामे होवू शकतात परंतू वसूली होत नाही त्यास कारणीभूत आपले अधिकारी आहे. सन २००१-०२ मध्ये जो मालमत्ता कर आकारणी झालेला आहे वार्डात ९० टक्के चूक केलेली आहे. चार पत्रेच्या रूमला ५०० रू. टॅक्स येण्याऐवजी ५००० पर्यत कर आकारणी केली. ज्यांना पाच हजार टॅक्स यायला पाहिजे त्यांना २०० रू. आलेला आहे. माझ्या वार्डाचा पुन्हा सर्वे करावा व योग्य मालमत्ता कर आकारणी करावी नागरीक कर भरण्यास तयार आहे.

श्री.सय्यद खुसरो :मस्जीद, मंदीर व गुरूव्दार असेल व टॅक्स आकारणी झाला असेल तर टॅक्स माफ करावे.

श्री.सलीम खॉन : वसूली न होण्याचे कारण काय माझ्या माहिती प्रमाणे अधिकारी कर्मचारी हे जातीने लक्ष देवून वसूली करीत नाही. ज्याचे मातीचे घर आहे त्यास १५६ कर यायला पाहिजे तेथे ५०००रू. आकारणी केलेली आहे.गणेश कॉलनीभागात माझे नातेवाईक कडून १००रू. घेवून टॅक्स जास्त लावलेला असून त्यानंतर हेरींग घेतले असता कमी झाला. जकात व इतर जी वसूली होत आहे ती पगारावर खर्च होते नगरसेवकांच्या वार्डात एकही काम होत नाही. नागरीक आम्हाला धारेवर धरतात. स्पके एजन्सीने बरोबर टॅक्स आकारणी केलेली नाही. ठेका रद्य करावा. बील देण्यात येवू नये.दिलेले बील परत घेण्यात यावे.

श्री.रेणुकादास वैद्य : स्पेकच्या बाबतीत आजच प्रश्न उद्भवण्याचे कारण काय ? एप्रिल महिण्यात नोटीसेस जाणे आवश्यक होते. आता नोटीसेस जात आहे. हे काम स्पेकचे होते परंतू त्यांचा कोणताही रिस्पॉन्स नसल्यामूळे उशीरा नोटीसेस वार्ड कार्यालया

मार्फत जात आहे. ५० टक्के लोक मागिल टॅक्सची नोटीस व स्पेकने आकारलेला टॅक्सच्या बाबतीत तक्रारी घेवून येत आहे. १०० रू. ऐवजी २०० रू. टॅक्स का भरणा करावा असे बोलल्यानंतर आमच्याकडे काहीही उत्तर नसते. म्हणून झोन अधिकारी यांचेकडे लेखी कळवावे व त्याचा निपटारा होईल असे त्याना सांगावे लागते. झोन कार्यालयात टॅक्स संबधी निर्णय होत नाही उपआयुक्ताकडे संबधीत नागरीक येतात त्यानंतर हेरींग होवून निर्णय होतो. यात दोन महिने निघून जातात जे टॅक्स भरणा करणारे आहे ते वसूली होत नाही ही जी सिस्टम आहे ती चूकीची आहे. स्पेक एजन्सीला जो सर्वे करण्यासाठी वेळ दिलेला होता. त्यांना मूदतवाढ दिली कूणाच्या मंजूरीने दिली हा भाग जरी वेगळाअसला तरी शहरात अनेक नवीन इमारती झालेल्या असून त्या इमारतीना नव्याने टॅक्स लावण्याची गरज असतांना तशी यंत्रणा उपलब्ध त्यांचेकडे नाही. स्पेकचे जे काम मर्यादीत होते ते संपलेले आहे असे माझे मत आहे त्याचे कार्यकाळात त्यांनी काम केले नाही पाच हजार रू. दंडाची प्रत्येक दिवसाला आकारणी करणार आहोत. तसे करारनाम्यात दिलेले आहे. दंडाची रक्कम वसूल करावी. जे बील आहे ते देण्याची गरज नाही. या सभागृहाची एक भूमिका असतांना प्रशासनाने वेगळी भूमिका घेणे योग्य नाही. जोपर्यत टेंडर च्या अटी शर्तीनूसार एजन्सी काम करणार नाही तोपर्यत त्यांना बील अदा करू नये दंडाची रक्कम वसूल करावी.सिडकोचा सर्वे करण्याचे काम हे स्थायी समितीची मान्यता नसतांना याच एजन्सीला दिले हे चूकीचे असून नवीन एजन्सीला सिडकोच्या सर्वेचे काम दयावे.

श्री.मुजीब खान : १८.२.२००६ च्या बैठकीत एक ठराव पारीत केला व टॅक्स कशा पध्दतीने आकारावे अ ब क ड नूसार आकारणी करावी असे दिले होते. अ ब क ड मध्ये कोणता भाग येतो हे सदस्यांना माहित होणे गरजेचे होते. माझ्या वार्डात ज्या इमारतीचा दर्जा अ वर्गात येतो त्यास ड वर्गाचा टॅक्स आकारणी स्पेकने केलेली आहे. अशी अनेक प्रकरणे आहे ज्या प्रमाणे मंजूरी दिली त्या प्रमाणे टॅक्स आकारणी झालेली दिसून येत नाही.मा. महापौर व पदाधिकारी यांनी पाच दहा इमारतीचा सर्वे करावा टॅक्स हा नियमानूसार लागलेला आहे का याची तपासणी करावी यावरून शहरातील इतर भागात कशा पध्दतीने टॅक्स आकारणी झालेली असेल हे लक्षात येईल. एक मोठया इमारतीचा ३५० रू. कर आकारणी झाली त्याच बाजूला २०×३० च्या प्लॉटला ३५०० टॅक्स आकारणी केली ही पध्दत बरोबर वाटत नाही. झोन कार्यालयात महानगरपालिकेचे कर्मचारी कामास लावून संपूर्ण सर्वे करण्याची गरजआहे. क्लिअर सर्वे होईल. एजन्सीला सर्वेचे काम देवून सुधारण होण्या ऐवजी बिघाड झालेली आहे. महानगरपालिकेने उत्पन्न बुडाले असून अनेक मोठमोठया इमारतीला आजपर्यत टॅक्स आकारणी केलेली नाही. महापालिकने जातीने लक्ष घालून काम केल्यास एक आठवड्यात एक वार्डाचा असा संपूर्ण वार्डाचा दोन महिण्यात सर्वे होईल. गरीब व मध्यम वर्गीय जे लोक आहे त्यांनाच टॅक्स जास्त आकारणी केलेली आहे. ज्या भावना मांडल्या त्या योग्य असून या संबधीत योग्य तो निर्णय घेवून कार्यवाही करावी. तसेच यासभागृहात

माजी सैनिकांना टॅक्स माफ केला होता. भरणा करण्यास गेल्यास टॅक्स घेतलेला नाही पूर्ण भरावा म्हणून मागणी केली.

श्री.काशिनाथ कोकाटे : मालमत्ता व पाणीपट्टीचे एकूण उद्दिष्ठ ७३ कोटीचे देण्यात आले होते. कर्मचारी कमी पडतात म्हणून सर्वेचे काम एका एजन्सीला सहा वर्षापूर्वी देण्यात आले. आशिया खंडात वेगाने वाढणारे हे शहर असून अनेक नवीन मालमत्ता झालेल्या आहे. ४१ कोटीचे उद्‌दिष्ठ दिले जास्त नसून चांगल्या पध्दतीने सर्वे केला तर ६० कोटी उत्पन्न मालमत्ता कराच्या माध्यमातून या महापालिकेस येवू शकते.जकात विभागातील कर्मचारी वसूलीसाठी लावून त्यानूसारच टारगेट दिलेले होते. वार्ड ड चे स्वच्छतेचे खाजगीकरण झाले तेथील १५० कर्मचारी असतील असे एकूण ३०० कर्मचारी उपलब्ध झाले. वसूली करण्याचे काम हे प्रशासनाचे आहे पदाधिकारी स. सदस्य यांनी हस्तक्षेप केलेला नाही. असे असतांना का वसूली झालेली नाही.प्रशासन सक्षम असून अनेक वेगवेगळे धोरण अवलंबीतात परंतू वसूलीच्या बाबतीत का केले नाही. वसूली होत नसेल तर कामे होणार नाही. एका संचिकेवर चर्चा करावी म्हटले की एक महिना जातो त्यामूळे अनेक विकास कामे थांबून राहतात. वसूली नाही तर खर्च होणार कोठून असा प्रश्न आहे. झोन वाईज माहिती घेणे आवश्यक आहे तर पूढील निर्णय घेता येईल. वार्ड ब ची थकबाकी २.८६ दाखविलेली आहे. परंतू एवढी थकबाकी नाही. मनमानी पणाने टॅक्स आकारणी केलेली आहे. टॅक्स नोटीसेस पाठविल्या व ते थकबाकीमध्ये घेतले. हे चूकीचे असेल तर संबधीत अधिकारी यांनी खूलासा करावा. चालू वर्षाची डिमांड १.५६ कोटी वसूली झाली १.३६ कोटी याचा अर्थ २० लक्ष आलेले नाही १०० टक्के ब वार्ड मध्ये वसूली झालेली आहे. दोन महिने बाकी आहे. २० लक्ष वसूली करणे कठीण नाही. नुसती स्पेक संस्थाच यास कारणीभूत नाही. एका वार्डात १०० टक्के वसूली तर दुसऱ्या वार्डात वसूलीच होत नाही यास वेगवेगळे कारणे होवू शकतात. यासाठी प्रशासनाने जास्तीत जास्त सक्षमतेने काम करावे नसता जो कर भरणा करतो त्यांचेवर पून्हा जास्तीचा कर लादला जातो. जे भरणा करीत नाही त्यांना मुबलक पाणी मिळते असा प्रकार होवू नये. वसूली होत नाही म्हणून वार्डात विकास कामे होत नाही हे निश्चित आहे का वसूली होत नाही प्रशासनाने खुलासा करावा.

श्री.हिम्मतराव दाभाडे : दोन दिवसापूर्वी मी वार्ड कार्यालयात गेलो असता श्री. पाटणी यांचे समोर एक गरीब स्लम भागातील व्यक्तीच्या एक खोलीला १० हजार रूपये टॅक्स आकारणी झालेली होती. त्यावेळी झोन अधिकारी यांनी जशी महागाई वाढती तसा टॅक्स वाढतो असे उत्तर मिळाले.

सौ.रजनी जोशी : सिडकोचे महापालिकेकडे हस्तांतरण झाले. तेथील सर्वेचे काम स्पेकला दिले. एका मालमत्तेस २,०००रू ऐवजी २२०००रू.तर गुप्ता नावाचे एक व्यक्ती २५ हजार टॅक्स आकारणी केली. ९ ते १० प्रकारचा कराचा उल्लेख केलेला आहे. या बाबतीत धोरणात्मक निर्णय घ्यावा स्पेकने सिडको भागात ज्या नोटीसेस दिल्या त्या सर्व रद्य कराव्या.सर्वेचे काम स्पेक एजन्सीला देण्यात येवू नये.

श्री.किशनचंद तणवानी :.आघाडीचे एकही सदस्य उपस्थित नाही सभा तहकुब करावी कोरम नाही.

मा. महापौर : अर्धा तासासाठी सभा तहकूब करण्यात येते (वेळ दुपार २.४५ वा पुन्हा सभा दु. ३.३० वा. सूरूवात. )

याच वेळी मा.आयूक्तांचे प्रतिनिधी म्हणून श्री.फड हे आसनगृहन करतात.

श्री.भगवान घडमोडे : सिडको स्कीमचे किती घरे,त्याचीसाईज काय आहे संपूर्ण रेकॉर्ड आहे एजन्सीला सर्वे करण्यासाठी देण्याचे गरज नाही.स्पेक एजन्सी चांगले काम करीत नाही. भाडेकरूच्या नावाने टॅक्स दिला एका मालकाचे घर भाडेकरूने बळकावले.असे प्रकार या एजन्सीकडून होत आहे. त्यांचेवर असलेली दंडाची रक्कम वसूल करावी व जकात विभागातील १५० कर्मचारी कामाला लावून सर्वे करावा.

श्री.संतोष खेंडके : अनेक गुंठेवारी भागात जल:निस्सारण वाहीनी नाही. परंतू करामधे जल:निस्सारण लाभ कर म्हणून नमूद केले. कोणत्या नियमाने वसूल केला जातो.तसेच नवयुवक गणेश मंडळाने एक निवेदन देवून जून्या शहरास घसारा कमी करून कर आकारावा नसता सामान्य कर कमी करावा अशी मागणी केली आहे. मूख्य रस्त्यावरील दूकाने तसेच मधल्या रस्त्यातील दुकाने यांना समान कर आकारणी होते या बाबतीत विचार करावा. स्पेक या एजन्सीला जे काम दिले त्यावर सभागृह नाराज असून जी वसूली झालेली आहे ती फारच कमी आहे. स्पेकने योग्य सर्वे केलेला नाही बरोबर करआकारणी केली नाही म्हणून लोक टॅक्स भरणा करीत नाही तसेच स्पेकने अनधिकृत बांधकामाचा कर मेन्शन केलेला आहे तो रद्य करावा. अनधिकृत बाधकाम कर म्हणजे दुसऱ्या रूपाने गुंठेवारी होय गुंठेवारी लागू करण्यासाठी फिस आकारणी करणार तसेच अनधिकृत बांधकामाचा कर वेगळा घेणार हे योग्य नाही. जास्त रक्कम भरण्याची वेळ आली तर कुणीही गुंठेवारीत रेग्यूलर करण्यासाठी पूढे येणार नाही.

श्रीमती जयश्री किवळेकर: सिडकोच्या मालमत्ता महानगरपालिकेकडे हस्तांतर झाल्या स्पेक या एजन्सीला सिडको भागातील मालमत्ता सर्वे व कर आकारणी करून देण्यासाठी मा.आयुक्तानी यापूर्वी एक बैठक घेवून घाईने निर्णय घेतला त्यावेळी सर्व सदस्यही उपथित होते.सभागृहात स्पेक विषयी केलेल्या तक्रारीचा विचार करून सिडको हडको भागातील सर्वेचे काम स्पेक या एजन्सीला देण्यात येवू नये. सिडकोच्या सर्व मालमत्ता हया स्वतंत्र आहेत सर्वे करण्याची गरज नाही.सर्वसारधारण सभेच्या निर्णयानूसार कर आकारणी करावी.

सौ. पार्वती वाघमारे : माझ्या वार्डातील पुंडलिकनगर व गजानन नगर भागातून दोन लक्ष रूपये कराच्या माध्यमातून लोकांनी भरणा केलेले आहे परंतू दोन वर्षात कोणतेही विकास काम झालेले नाही. इतरही लहान मोठया सुविधा गेल्या १५ वर्षापासून मिळत नाही. पाणी देणे आवश्यक आहे.दोन लक्ष रू. लोकांनी भरणा केल्यावर पाण्यासारखी सूविधा देण्यास हरकत नसावी. दोन तीन गल्ल्यामध्ये पाणी दिल्यास पूढील गल्ल्यातील नागरीक टॅक्स भरण्यास सूरूवात करतील.

मा. उपमहापौर : दोन वर्षात स्पेक या एजन्सीमूळे महानगरपालिकेचे मोठे नूकसान झालेले आहे. स्पेकला सन २००४ मध्ये एक वर्षासाठी सर्वेचे काम दिले काम वेळेत पूर्ण न झाल्यामूळे पून्हा सहा महिने मुदतवाढ दिली.त सहा महिन्याची मुदत संपल्यानंतर पून्हा कुणी मुदत दिली सभागृहात तसा प्रस्ताव आलेला होता का?याचाही खूलासा करावा.शहरात काही मालमत्ताचे रेकॉर्ड मिळत नव्हते म्हणून उत्पन्न कमी येत होते त्यासाठी स्पेक एजन्सीला नवीन मालमत्ता शोधण्यासाठी सर्वेचे काम दिले यासाठी एक वर्षात करणे आवश्यक होते. स्पेक या एजन्सीने आजही ३० हजार मालमत्तेचा सर्वे केलेला नाही आरोप आहे. ९कोटी वसूली केली मागिल वर्षाच्या बरोबर आहे असे म्हटले परंतू एजन्सीला सर्वेचे काम दिल्यानंतर दर वर्षी किती उत्पन्न यायला पाहिजे. किती मालमत्ता वाढलेल्या आहे. कशा पध्दतीने कर आकारणी केलेली आहे याचा स्पष्ट खूलासा होणे अपेक्षीत आहे. तो न करता सभागृहाची दिशाभूल केली जात आहे हा माझा आरोप आहे.स्पेक एजन्सीकडे टेक्नीकल कर्मचारी सर्वेसाठी नाही. वार्डातही काही कर्मचारी वसूलीसाठी जातात त्यांना कूणी अधिकार दिले याचाही खूलासा करावा. तीन हजार टॅक्स असतांना तेथे १७ हजार केला नंतर वाटाघाटी करून त्या शिकावू उमेदवारानी कमी केल्यानंतर त्या प्रमाणे टॅक्स आकारणी होते. हे पुराव्यानीशी दिलेले आहे. त्या कर्मचाऱ्याला कामावरून काढून सूध्दा टाकलेले आहे. ही सत्य बाब आहे. अशी प्रकरणे निदर्शनास येत असतांनाही देण्यात येणारे स्पेक बील कशाच्या अधारे दिले जात आहे.तसेच काम समाधानकारक नसतांना सिडकोचा सर्वेचे काम त्याच एजन्सीकडे का दिलेले आहे. काम वेळेत न केल्यास पाच हजार रू. प्रति दिन दंडात्मक कार्यवाही त्यांचेवर होणार आहे. स्पेक एजन्सीला यापूढे कोणतेही बिल देवू नये व दंडाची रक्कम ही व्याजासहीत वसूल करावी हा आदेश मा. आयुक्ताच्या निदर्शनास आणून दयावा. लोकांना नोटीसेस दिल्यानंतर हेरींग साठी स्पेक एजन्सीची गरज नाही. महानगरपालिकेने घ्यावी. १०० व्यक्ती मागे ६० व्यक्तीची हेरींग घ्यावी लागते हे बरोबर नाही.यामूळे महानगरपालिकेने उत्पन्न वाढणार नाही. तसेच मालमत्ता विभागाचे विभाजन केलेले आहे ते एकत्र करून सर्व रेकॉर्ड एकत्र ठेवावे अशी मागणी आहे. स्पेक एजन्सीला सिडकोचा सर्वेसाठी दिले ते रद्य करावे. सिडको कार्यालयात महानगरपालिकेने कर्मचारी देवून काम करावे.जेणे करून टॅक्स आकारणे वसूल करणे ही कामे सुरळीत होतील. जे अधिकारी स्पेक या एजन्सीची पाठराखन करत असतील त्यांचेवरही कार्यवाही व्हावी.तसेच स्पेककडून जे कार्यालयासाठी जागा दिली आहे त्यांचे भाडे व तेथील लाईट बील वसूल करण्यात यावे.

श्री.प्रकाश अत्तरदे : स्पेक एजन्सीकडील सर्वेचे काम बंद करावे व महानगरपालिकेतील जकात विभागातील कर्मचारी त्या कामास लावून कार्यवाही करावी.

प्र.मा.आयुक्त : महानगरपालिकेचा कर मूल्यांकन विभाग हा दुर्लक्षीत विभाग आहे. १९८२ साली महानगरपालिका अस्तित्वात आली. मुळ रीव्हीजन हे १९८९ साली करण्यात आले.त्यानंतर मोठे रिव्हीजन झाले नाही. जो टॅक्स आकारला जातो तो कायम

असतो एनआरव्ही बदलत नाही. रेट ऑफ टॅक्सेशन बदलते. जर भाडेकरू असेल किंवा जूने घर पाडून बांधलेले असेल तर करात वाढ होवू शकते. डीमांड आणि ॲसीसमेन्ट रजिष्टर दर चार वर्षानी ऑथर्डीकेशन आणि आडपक्शेन करणे बंधनकारक आहे. पूर्ण शहराचा सर्वे करू शकेल इतका कर्मचारी वर्ग या विभागात नव्हता. त्यामूळे तत्कालीन आयूक्त यांनी आदेशीत केले की हे रेकॉर्ड संगणकीकरण करावे. २००४ मध्ये जेव्हा स्पेकला हे काम दिले त्यावेळी रेंन्टची संकल्पना महानगरपालिकेत होती. बाधकाम हे निवास किंवा कमर्शियल असेल त्यानूसार टॅक्स आकारणी होते. गेल्या वर्षी जे सुसूत्रिकरण केले जे की घर मालकाकडे भाडेकरू आहे किंवा नाही या नावाखाली घर मालकांना जो रेन्टचा त्रास होत होता तो रद्य केला सिडको हडको भागात जो बिल्टप एरीया आहे त्यावरच टॅक्स लागणार आहे भाडेकरू असे किंवा नसे त्यामूळे टॅक्समध्ये बदल होणार नाही. १२ हजार तक्रारी आल्या होत्या त्यातील ७० टक्के तक्रारी हया भाडेकरूच्या संदर्भातच होत्या यातील हेरींगसाठी ६२२९ लोक आहे. १.४३ मालमत्तेचा सर्वे पूर्ण झालेला आहे दोन तीन हजार मालमत्ता हया लॉक असतील किंवा तेथे कूणी राहत नसतील तेवढाच मालमत्तेचा राहिलेल्या आहे. हे अगोदर महानगरपालिका पूर्ण तपासणी करून घेणार आहे स.सदस्याकडे जर काही तक्रारी असतील तर त्याही प्रशासनाकडे सूचवाव्या वार्ड वाईज हेरींग लावण्याची प्रशासनाची तयारी आहे. भविष्यात नागरीकांना त्रास होवू नये जो टॅक्स योग्य आहे तो त्यास लागलाच पाहिजे. चूकून काही हेरींगसाठी नोटीसेस गेलेल्या आहे वार्ड कार्यालय व या कार्यालयाकडे तशी तक्रार आली तर त्यांची तात्काळ नोंद घेवून कार्यवाही होईल. जे करता येत असेल त्यात लगेच दुरूस्ती केली जाईल.

श्री.मुजीब खान : एकाही नागरीकांना बरोबर नोटीस मिळालेली नाही. कोणत्या बेसेसवर वसूली होत आहे.जेंव्हा चौकशी केली होती त्यावेळी स्पेकला तसे अधिकार होते काय? सुनावणी घेतल्यानंतर अनेक नागरीकांना १८०० ऐवजी २१००/- रू टॅक्स आकारणी झाली, स्पॉट बघूनही अधिकारी सांगतात की, जुना टॅक्स आकारला जाणार नाही. जो आकारणी केलेला तो बरोबर आहे. संबधीत एजन्सी दिशाभूल करीत आहे. स्पेकचा ठेका रद्य करावा महानगरपालिकेचे अधिकारी वार्ड कार्यालयात बसून एका आठवडयात एक वार्डाची सुनावणी होवू शकते व प्रकरणे निकाली लागू शकतात दोन महिण्यात पूर्ण वार्डाचा सर्वे होवू शकतो. अनेक नागरीक नुसत्या पावत्या घेवून कार्यालयात चकरा मारतात. कर कसा भरावा हे कळेना. नागरीक कार्यालयात तक्रारी घेवून जातात त्यांना बरोबर उत्तर मिळत नाही. स्पेकने आकारणी केली असे सांगितले जाते. हे योग्य नाही. अगोदर प्रशासन नंतर स्पेकचा अधिकार होवू शकतो. एक हप्त्यात जे शहरात नागरीक राहतात त्यांना सूविधा मिळाल्या पाहिजे. नव्याने सर्वे करण्यात यावा. स्पेकच्या सर्वेमध्ये एकही डिमार्करेशन नाही किती रूम आहे हे नमूद नाही. अंगण किती बेडरूम किती आहे. हे कूठेही सर्वेमध्ये नमूद नाही सर्वेचे काम दिले या एजन्सीने कोणते काम केलेले आहे याची माहिती दयावी. त्यांना बील कशाच्या अधारे दिले. जनतेचा पैसा

अशा पध्दतीने खर्च केला तर वार्डात कोणतेही काम होणार नाही. आजही वार्डात विकास खुंटलेला दिसून येतो. पैसे घेवून ५० टक्के टॅक्स कमी केला जातो याचा अर्थ काय? नव्याने सर्वे करून नवीन नोटीसेस दिल्या जाव्यात असे झाले तर नागरीक टॅक्स भरण्यास स्वत: पूढे येतील लोकांची भावना चांगली आहे .

श्री.सय्यद खुसरो : जे जुने घर आहे त्यांचाही टॅक्स वाढवून दिलेला आहे हे योग्य नाही. स्पेक एजन्सीचा ठेका रद्य करावा नंतर यावर चौकशी व चर्चा करावी. पुर्वीप्रमाणे टॅक्सची वसूली करावी.

श्री.संतोष खेंडके : जो स्पेकने सर्वे केला तो संपूर्णत: चूकीचा झालेला आहे. नव्याने सर्वे करावा.

श्री.गजानन रामकिसन बारवाल : मामा चौक मध्ये कूठेही माझे घर नसतांना दोन नोटीसेस माझ्या नावाने आलेल्या आहेत. मी जी इमारत बाधंलेली होती प्लॅट सर्व लोकांना दिलेले आहे त्या नागरीकांनी अनधिकृत बांधकाम केलेले नसतांना सर्वांना नोटीसेस दिलेल्या आहे. रेणूका माता मंदीरास टॅक्स का आकारला याचा खूलासा देण्यात यावा.

श्री.सलीम खॉन : स्पेकला दिलेला सर्वेचे काम रद्य करावे. नव्याने महापालिकेने सर्वै करावा.मदीरांतील पूजारी तसेच मस्जीद मधील पेशइमाम यांना दिलेला टॅक्स रद्य करावा.

कर मुल्य.निर्धा.संकलक :मालमत्ता कर योग्य आकारला पाहिजे ही रास्त मागणी आहे. १.१३ लक्ष नागरीकांना नोटीसेस दिलेल्या होत्या वार्ड कार्यालयानां नोटीसच्या तक्रारीचे निवारण करण्याचे अधिकार दिलेले होते. ११ हजार तक्रारी होत्या.

श्री.प्रशांत देसरडा :नोटीसेस चूकीच्या दिल्या म्हणून काही मालमत्ता धारक तक्रारी घेवून आले नाही.सभागृहाचे मत लक्षात घेता सिडकोतील स्पेकला दिलेले सर्वेचे काम थांबवावे. तसेच जे काम स्पेकला दिले होते ते योग्य केलेले आहे किंवा नाही. यासाठी एक चौकशी समिती नियुक्त करावी. पदाधिकाऱ्याना विश्वासात घ्यावे. व तसा अहवाल पूढील बैठकीत सादर करावा.त्यानूसार ठेका रद्य करायचा की नाही निर्णय घेता येईल.एक दिवसाला ५ हजार रू. आकारणी करण्याचे नमूद आहे दोन वर्षाची रक्कम किती होते . डिपॉजीट रक्कमही तेवढी नसेल असे वाटते. हॉलचे भाडे किती. यासाठी चौकशी नियुक्त करावी.

कर मुल्य निर्धा.व संकलक: नागरीक तक्रारी घेवून केंव्हाही आल्यास वार्ड कार्यालय खुले आहे. बोगस नोटीसेस दिलेल्या नाही यामूळे नागरीकामध्ये वेगळा संदेश जावू शकतो.

श्री.मुजीब खान : टॅक्सच्या बाबतीत एक महिण्यात क्लिअर केले नाही तर आम नागरीकांना आम्ही टॅक्स भरू देणार नाही. प्रशासन चूक लपवित आहे. जुना जो कर होता तो भरण्यास नागरीक जातात परंतू घेतला जात नाही तो भरून घेण्याचे आदेशीत करावे

श्री.सिताराम सुरे : गुंठेवारी भागात पथकर वृक्षकर लावलेला आहे तोही रद्य करावा. कोणतीही सूविधा दिली जात नाही सुविधा देण्यात याव्यात ज्या भागात सूविधा दिल्या त्याच भागात यापूढे कर आकारणी करावी.

मा.महापौर : सभागृहात सकाळ पासून मालमत्ता कराबाबत चर्चा चालू आहे. स्पेकच्या सर्वेमूळे एका एका घराला दोन-दोन,तीन-तीन नोटीसा दिलेल्या आहेत. त्या नोटीसी

सुध्दा बरोबर नाहीत. एकदा एक हजार असेल, दूसऱ्यावेळी दोन हजार,तीसऱ्या वेळी तीन हजार असेल. एकंदर सर्व पाहता स्पेकचे अधिकार काय? या बाबतीत चर्चा झाली. नॉन टेक्नीकल लोकांनी सर्वे केला. या बद्दलही चर्चा झाली आणि सर्व पाहता स्पेकने जसे काम केले, त्या कामाची चौकशी करण्याची गरज आहे. आणि ती चौकशी करण्यासाठी सभागृहातील पदाधिकारी आणि १. श्री.मुजीब आलमशहा खान,२.श्री.अ.रशिद खान मामु,३.श्री.गजानन बारवाल,४.श्रीमती आशा बिनवडे, व चार पदाधिकारी अपक्ष व सत्ताधारी पक्षातील दोन दोन जण या सहा लोकांनी चौकशी करायची व सभागृहात अहवाल द्यायचा. स्पेकचे जे आताचे पेमेंट असेल, ते व पूढील कोणतेही पेमेंट संबंधीतांना देण्यात येवू नये.

मंदिर व मस्जिद यांना जो टॅक्स लागलेला आहे तो टॅक्स लावू नये., बेनामी प्रॉपर्टीला टॅक्स लावलेला असेल ती प्रॉपर्टी कोणाची आहे, त्यावर नांव द्यावे. त्यांचेवर बेनामी म्हणून नांव काढण्यात येवून, नावानिशी टॅक्स लावण्यात यावा.

स्पेकचे काम करत असतांना सुपरव्हिजन करण्यात आलेले नाही, त्याची चौकशी होणार आहे. जून्या घराचा टॅक्स जून्या एन.आर.व्ही.प्रमाणेच लावण्यात यावा. जे नागरीकांना नोटीस मिळालेली आहे, त्यांचेकडे भरपुर टॅक्स बाकी आहे. त्यांचे पेपर पब्लीकेशन द्यावे की, त्यांचेकडे एवढा एवढा टॅक्स बाकी आहे. तसेच जूना लावलेला टॅक्स घेतला पाहीजे. स्पेकच्या अगोदर जे टॅक्स असेल, त्याचे पब्लीकेशन करावे. आणि सिडको भागामध्ये जे स्पेकचे काम सुरू झालेले आहे, ते त्वरीत बंद करण्यात यावे. व सिडको भागात नविन कर मुल्या निर्धारण विभाग उघडावा. व त्या ठिकाणी पावत्या देण्यांत याव्या. व सर्वसाधारण सभेने ठरविल्याप्रमाणे टॅक्स लावण्यात यावा.

श्री.संतोष खेंडके : मालमत्ता कर वसूली संदर्भात वार्ड निहाय माहिती घेण्यात यावी.

मा. महापौर : वार्ड निहाय कर वसूली संदर्भात वार्ड अधिकारी यांनी माहिती दयावी.

वार्ड अधिकारी -अ : एकूण मालमत्ता १९,२०० मालमत्ता,थकबाकी २.०३ कोटी चालू मागणी १.८३ कोटी ३.८६ कोटीची मागणी आहे. ३४५ मालमत्ता जास्तीच्या झालेल्या आहे.

श्री.मुजीब खान : ज्यांना टॅक्सच आकारला जात नव्हता अशा किती मालमत्ता स्पेकने शोधून काढलेल्या आहे.

वार्ड अधिकारी -अ : जुने प्रमाणे कर वसूल करीत आहे. स्पेकने डिटेल माहिती दिलेली नाही. आता लगेच त्या संबधीची माहिती नाही.

श्री.मुजीब खान : झोन मध्ये नागरीक कर भरण्यास जातात स्पेकने कर लावलेला आहे त्याप्रमाणे भरावा असे म्हटले जाते. कर भरणा करून घेतला जात नाही.

श्री.प्रशांत देसरडा : संबधीत वार्ड अधिकारी बरोबर बोलत आहे त्यांचेवर दबाव आणून नये. स्पेकने वार्ड कार्यालयाकडे नोटीसेसच दिलेल्या नाही.

वार्ड अधिकारी : स्पेकने वार्ड कार्यालयात अदयाप पर्यत नोटीसेचे रेकॉर्ड दिलेले नाही. जुन्या पध्दतीने जो कर आकारणी होत होता, तो वसूल करीत आहे.

मा. महापौर : स्पेकने वार्ड कार्यालयाकडे नोटीसेस दिल्या नाही तर नागरीकांना नोटीसेस कूणी दिल्या.

करमुल्य निर्धा. व संकलक:स्पेकने सुनावणीसाठी नोटीसेस दिलेल्या होत्या. त्यासाठी वार्ड कार्यालय येथे स्थळ निश्चित केले होते. स्पेकने केलेला पूर्ण सर्व महानगरपालिकेने अदयाप अमलात आणलेला नाही . ज्यांना सुनावणीसाठी नोटीसेस दिल्या त्यांना फायनल डिमांड बिल देत आहोत. सर्व रेकॉर्ड महानगरपालिकेकडे हस्तांतर होईल त्यानंतर ते वार्ड कार्यालयाकडे जाईल.

श्री.प्रशांत देसरडा : कार्यवाही अर्धवट असतांना स्पेक एजन्सीला ७० लक्ष रू.कोणत्या बेसेसवर दिले.

वार्ड अधिकारी -अ : दिं. १.४.२००६ ते २०.१.२००७ पर्यत एकूण या झोनची वसूली १.१९ कोटी झालेली आहे.मागिल वर्षी याचकालावधीपर्यत वसूली ही ९९ लक्ष होती.

श्री.देसरडा प्रशांत :या झोन अंतर्गत ज्या मालमत्ता आहे त्या सर्वांना डिमांड नोटीस दिलेल्या आहेत का.

वार्ड अधिकारी-अ : डिमांड नोटीस देण्याचेकाम चालू आहे.

श्री.संतोष खेंडके : स्पेक एजन्सीला बील देवू नये उलट स्पेक एजन्सीवर दंडात्मक कार्यवाही करावी तसेच त्या एजन्सीवर फौजदारी गून्हा दाखल करावा.

श्री.अ.रशिद खॉन : मालमत्ता हस्तांतर केल्या नाही.त्याबध्दल ॲक्शन घ्यावी. सभागृहाने मूदत वाढवून दिली का. दिली असेल तर संबधीत एजन्सीवर दंडात्मक कार्यवाही केल्यास न्यायालयात दाद मागेल. यात महानगरपालिकेचे नुकसान होईल. ८० टक्के स्लम भाग काही वार्डात आहे. कशी वसूली वाढेल.

मा. महापौर : चौकशी करण्यासाठी समिती नियुक्त केली आहे.अहवाल समोर आल्यानंतर कार्यवाही होईल.

वार्ड अधिकारी -ब :एकूण मालमत्ता ६२६२ असून त्यापैकी एमआयडीसी भागात ६३२ यूनीट आहे २४७ युनिट बंद आहे एकूण थकबाकी ३.३८ कोटी असून चालू वर्षाची १.६४ करोड मागणी आहे. एकूण मागणी ५.०२ कोटी असून त्यापैकी २.३५ कोटी जे बंद यूनिटचे आहे वसूली न होणारे आहे ती वसूली न होता एकूण वसूली २.६७ कोटी आहे. आतापर्यत १.४२ कोटी वसूली झालेली आहे. सिडको कार्यालयाकडे पाणीपट्टीचीही वसूली ही वार्ड अधिकारीच करतात.

श्री.मुजीब खान : ज्या कंपन्या बंद झालेल्या आहे त्यांचेकडे कर थकलेला आहे त्या बाबतीत काय कार्यवाही होत आहे.

वार्ड अधिकारी-ब :गेल्या वर्षी ३८ कंपनीवर ॲटचमेंन्ट केली आहे. परंतू त्या कंपनी बॅंकेकडून जप्त झालेल्या आहे तेथे काहीच नाही. जप्ती करून पूढील कार्यवाही होत आहे.

श्री.मुजीब खान : ज्या कंपन्या बंद आहे त्यांचेकडे कर थकलेला असून त्या अस्तित्वात नाही. या बाबती आजपर्यत लिगल कार्यवाही का झालेली नाही. याकडे दुर्लक्ष का केले जाते.या बाबतीत जबाबदार कूणाला धरायचे.

वार्ड अधिकारी -ब : झालानी टूल्स या कंपनीतील लेबरचे अदयाप पेमेंन्ट झालेले नाही. त्यांना बॅंकेने यूनीटने ॲटॅचमेंन्ट केलेले आहे.

श्री.मुजीब खान :एखादी कंपनीकडे पूर्वीचा कर थकलेला असेल ती कंपनी दुसऱ्या मालकास विक्री केली किंवा त्या जागेवर दुसरे कमर्शियल वापर होत असेल तर मागिल टॅक्स वसूल केलेला आहे काय मागिल करासह वसूली करावयास पाहिजे. गरीब लोकांचे घराचे कर मागिल थकीत रक्कमेसह नोटीस दिली जाते. हे बरोबर नाही. नियमानूसार वसूली करावी.

श्री.सय्यद खुसरो : ज्या कंपनीकडे बँकेचे कर्ज असेल ती कंपनी बंद झाली असेल तर जप्तीच्या वेळी महानगरपालिकेचा कर थकलेला आहे म्हणून सदर बँकेला तसे कळवायला पाहिजे. त्यानूसार वसूली होवू शकते.

वार्ड अधिकारी :-ब : तसे पत्र एमआयडीसी आणि डीआरडी ला सूध्दा दिले आहे. कार्यालयास दिलेले आहे.

श्री.मुजीब खान : एपीआय कंपनी बंद पडली तर टॅक्स कूणाकडून वसूल केला.

वार्ड अधि.-ब : स्पेन्सर्स कडून टॅक्स वसूल केलेला आहे. भारत बाजारला जो टॅक्स लावलेला आहे तो वसूल केलेला नाही.

मा. महापौर : वार्ड अधिकारी - क यांनी वसुलीच्या संदर्भात माहिती दयावी.

वार्ड अधिकारी -क : एकूण ८८१३ मालमत्ता असून, थक्बाकी २.१८ चालू मागणी १.४५ कोटी एकूण मागणी ३.६४ कोटीची असून या वार्ड कार्यालय अंतर्गत एकूण ६ स्लम भाग आहे.८० टक्के आहे.

मा. महापौर : वार्ड अधिकारी -ड यांनी वसूलीच्या संदर्भात खूलासा करावा.

वार्ड अधिकारी -ड : एकूण मालमत्ता १६९१९ असून ,१६३ नवीन मालमत्तेचा सर्वे करून कर आकारणी केलेली आहे. १७३८२ एकूण मालमत्ता झालेल्या आहेत. एकूण पाच स्लम भाग येतात. थकबाकी ५.२२ चालू मागणी २.७२ मागिल वसूली ५.१० कोटी या वर्षी ३.२२ कोटी वसूली झालेली आहे. एप्रिल पासून नोटीसेस तयार करतो व जून पर्यत देण्यात येते.या वर्षी बिले सप्टेंबर ऑक्टोबर मध्येही तयार झालेली नव्हती. मा.महापौर यांनी दिलेल्या आदेशानूसार जर बिले तयार झाली नसेल तर हस्तलिखित बिले तयार करावी. त्यानूसार १ लक्षची त्यानंतर ५० हजारची त्यानंतर २५ हजारची व आता १० हजार पर्यत कर असलेली बिले दिली जात आहे. १७०० मालमत्ता हया ५००० रू. पेक्षा जास्त रक्मेच्या थकबाकीदार आहे. १०हजार मालमत्ता यांचेकडे १२०० रू. पर्यत थकबाकी आहे. ३६२ मालमत्ता धारकाकडे ५० हजार पर्यत थकबाकी आहे.६ ,२०० मालमत्ता कडे १००० रू.प्रत्येकी कर थकीत आहे. ५०० रू. पर्यत असलेल्या थकीत मालमत्ताधारक हे ७५०० आहे.

श्री.मुजीब खान : स्पेकने दिलेल्या नोटीस नूसार वसूली केली की पूवीच्या टॅक्स आकारणी प्रमाणे वसूली केली याची माहिती दयावी.

वार्ड अधिकारी -ड : ज्यांना स्पेकने आकारलेला टॅक्स मान्य आहे त्याकडून भरणा करून घेतलेले आहे. उर्वरीत जुन्या दरा नुसार टॅक्सची वसूली केली जात आहे.

श्री.संतोष खेंडके : स्पेन्सर्सला टॅक्स लावलेला आहे काय? विशाल मॉलचा टॅक्स मा.कर मुल्य निर्धारक व संकलक यांनी आकारलेला आहे. स्पेन्सर्समध्ये मी स्वत: गेलो होतो त्यांना टॅक्स लागलेला आहे. बील देण्यांत यावे.

वार्ड अधिकारी -ई : या वार्ड कार्यालया अंतर्गत गुंठेवारीचा भाग जास्त येतो व पुर्वी लागलेला कराच्या मालमत्ता ११ हजार येतात. ४.६८ एकूण मागणी आहे. ३.६४ थकबाकी चालू मागणी १.०३ कोटी असे एकूण ४.६८ कोटीची मागणी आहे. ५७ लक्ष वसूल झाले आहे कॅम्प लावून वार्डवाईज कर भरण्या बाबत पूकारण्यात आले. त्यानूसार वसूलीची कार्यवाही केलेली असून ५०,००० रू. पर्यतचे थकबाकीदार ५६ होते त्यांना विहित मुदतीत नोटीसेस देवून जप्तीची कार्यवाही करण्यासाठी कार्यवाही होत आहे. ज्यांचेकडे जूना दराप्रमाणे कर आहे त्यांना कर भरण्यासाठी आवाहन करण्यात येत आहे.

श्री.मुजीब खान : वार्ड ई कार्यालय अंतर्गत चिकलठाणा पोलीस स्टेशन येते तसेच एमएसईबीचे पावर हॉऊस आहे, त्यास कर लावलेला आहे काय याचा खूलासा करावा.

श्री.मधुकर सावंत : उच्च न्यायालयाची इमारत तसेच विमान तळास कर आकारलेला आहे का ?

वार्ड अधिकारी -ई : जी शासनाचे कार्यालये आहे, त्यास कर आकारणी करण्याबाबत कार्यवाही चालू आहे अंतिम टप्प्यात आहे. एअर पोर्टला टॅक्स लागलेला नाही.

करमुल्य निर्धा.व संकलक: एअरपोर्टला टॅक्स कशा पध्दतीने आकारणी करायची त्याचे निकष नव्हते. पुण्याला नुकतेच प्रशिक्षणासाठी गेलो असता पूणे अहमदाबाद अशा ठिकाणी एअरपोर्टला त्यांचे एनआरव्ही च्या १५ ते २० टक्के टॅक्स आकारला जातो. माहिती घेवून आलेलो आहे. चालू वर्षापासून कर आकारावा लागेल.

मा. महापौर : शासनाचे ज्याइमारती आहे त्यास नियमानूसार टॅक्स आकारणी करावी. आता .वार्ड फ कार्यालयाची वसूली संदभृत माहिती दयावी.

वार्ड अधिकारी -फ : एकूण मालमत्ता २४१४९ असून डिमांड १०.९२ कोटी आहे. वादग्रस्त न्यायालयीन मालमत्ता न सापडत असलेल्या मालमत्ता तसेच मोकळया जागा हे वगळा एकूण डिमांड ८.२१ कोटीची होती. २.५२ कोटी वसूली ३१ टक्के झालेली आहे. ५२ लक्ष रूपये गेल्या वर्षी पेक्षा जास्त वसूल झालेले आहे मार्च अखेर ५.५० कोटी वसूली होईल अशी अपेक्षा आहे. न सापडलेल्या मालमत्ता ७३, मोकळया जागा ४६ आहेत.

श्री.मो.जावेद मो.इसहाक : या वार्ड कार्यालयात डुप्लीकेट पावती छापून ते वाटप केलेल्या होत्या व त्यानुसार वसूली करून मोठा भ्रष्टाचार झालेला होता. ही बाब सत्य आहे की नाही.

वार्ड अधिकारी -फ : ३१ मार्च रेकॉर्ड तपासणी केल्या नंतर १.७० लक्ष कमी आढळले त्यानूसार मा.आयुक्ताच्या हे निदर्शनास आणून दिले व संबधीत कॅशीयर विजय वाघमारे यांचेवर पोलीस गुन्हा दाखल केला होता. त्यानूसार पोलीस तपासणी करीत आहे.

श्री.सलीम खान : श्री. पाटणी हे वर्ग-२ की वर्ग -३ मध्ये येतात. त्यांचेकडे किती दिवस हा कार्यभार राहणार आहे. असा कार्यभार देता येतो का याचा खूलासा करावा.

श्री.मुजीब खान : पाणी पट्टी व मालमत्ता कराची पावती वेगवेगळी जाते ती एकत्रीत देण्यात यावी. काम सोपे होईल.

मा. महापौर : पूढील वर्षी पासून मालमत्ता कर तसेच पाणी पट्टीची पावती नोटीस ही एकत्रित पाठविण्यात यावी. जेणे करून कर वसूल करण्यास सोपे होईल.

श्री.अ. रशीद खॉन : ज्यांचे नावावर घर असेल त्यांचेच नावावर नळाची पावती दिली जावी वसूली जास्त प्रमाणात होईल.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : पत्र देवून माहिती विचारणा केली होती. कमर्शियल नळ कनेक्शन ८३२ असल्याचे उत्तर मिळाले पोलीस आयुक्त कार्यालयाकडून माहिती घेतली असता ३०० बिअरबारला परवानगी तसेच ३०० खानावळला परवानगी दिली आहे. तसेच शहरातील कमर्शियल दुकाने ७२ हजार असून संबधीत कार्यालयाने परवानगी दिलेली आहे. शहरात ४२ दवाखाने असून कमर्शियल कनेक्शन दाखवले असून जी माहिती दिली आहे त्यात आपल्या दवाखान्याचे नाव नाही. डॉ.कराड यांचे दवाखान्यासाठी कमर्शियल कनेक्शन दाखवले नाही.

मा.महापौर : माझे स्वत:च्या दवाखान्यास कर्मशियल कनेक्शन आहे टॅक्सही त्याप्रमाणेच भरणा केला जातो. आपण आपले शब्द मागे घ्यावे.

उपअभियंता (पापू) : डॉ. कराड यांचे हॉस्पीटमलमध्ये व्यावसायीक नळ कनेक्शन आहे.

श्री.अ.साजेद अ. सत्तार : मी माझे शब्द मागे घेतो, परंतू या शहरात ४२ कमर्शियल कनेक्शन आहे का? २९ बर्फचे कारखाने असून ३०० शादीखाना आहेत कमर्शियल कनेक्शन एकही दाखविलेले नाही. बाबा पेट्रोल पंप ते प्रेसिडेंन्ट पार्क चौक पर्यत २७ कमर्शियल कनेक्शन दाखवले माझ्या माहिती नूसार मी स्वत: खर्च करून विविध सरकारी कार्यालयाकडून माहिती घेतली असता १ लक्ष कमर्शियल धंदे आहे त्यापैकी २५ हजार नळ कनेक्शन कमर्शियल गृहीत धरले तर दर वर्षी महानगरपालिकेला १२ ते १३ कोटीचे नूकसान होत आहे. मी सर्वे केला तर ३००० दवाखाने असून त्यांना कमर्शियल कनेक्शन का नाही. ३१ कोटी दर वर्षी पाणीपट्टीतून मिळते व १२ कोटीचा तोटा होत आहे. सर्व कमर्शियल कनेक्शन शोधले तर ७२ कोटीची वसूली होवू शकते. मालमत्ता शोधल्या जातात नळ कनेक्शन का शोधले जात नाही. पूर्ण माहिती आपल्याकडे सादर करीत आहे,जे दोषी असेल त्यांचेवर कार्यवाही करावी.

श्री.गजानन रामकिसन बारवाल : विरोधी पक्ष नेते यांनी चांगला विषय मांडलेला आहे माहिती घेतली आहे त्याबध्दल त्यांचे अभिनंदन करतो.

श्री.भगवान घडमोडे :आताच विरोधी पक्ष नेता यांनी सर्वे करून दिला सर्व नोंदणी करून माहिती घेतली मी प्रशासनास पत्र दिले होते दुकाने हॉटेल ३२७८ दाखविले व कमर्शियल नळाची संख्या ८३२ दिली. हे योग्य वाटत नाही. जवळपास ५ हजार कमर्शियल नळ कनेक्शन ची माहिती घेतली असती तर मिळाली असतील ते ही काम अधिकारी करू शकले नाही. गरीबाचें नळ कनेक्शन तात्काळ तोडले जाते. सर्व नळ कनेक्शन कमर्शियल करून वसूली करावी.

मा. महापौर : जी यादी माझे कडे आलेली आहे ती सर्व झोन अधिकारी यांना त्या त्या वार्डनूसार दिली जाईल व वार्ड अधिकारी यांनी त्या त्या ठिकाणी जावून त्या दुकान असेल हॉटेल असेल त्याचे नळ कनेक्शन कमर्शियल करावे.

श्री.मो.जावेद मो. इसहाक:जी यादी मागविली होती त्यात अदालत रोडवर २१, औरंगपूरा १९,भडकल गेट, ५ बसस्टॅण्ड २५ कनेक्शन, चिक्लठाणा १५ कनेक्शन, चिश्चिया कॉलनी ४, चौक मध्ये ६सिडको हडको १५० कनेक्शन फाजीलपूरा २,खडकेश्वर १३ कनेक्शन गुलमंडी १३, हर्सूल ४ जाफरगेट १२ जलगाव रोड १ कनेक्शन, जालना रोड २४, जूना बाजार ८, कैसरकॉलनी ८ किराना चावडी २,शहाबाजार १. चलीपूरा २,पाणीपूरवठयामध्ये अनेक दिवसापासून मोठा भ्रष्टा चार होत आहे. या संदर्भात सीबीआय मार्फत चौकशी करावी. ६० ते ७० कोटीचे नूकसान होत आहे त्यांचेवर कार्यवाही झाली पाहिजे. कमेटी नियुक्त करून पनेशमेन्ट झाली पाहिजे.

मा. महापौर : जी यादी श्री.अ.साजेद अ.सत्तार यांनी दिली आहे ती यादी झोन कार्यालयाकडे दिली जाईल व झोन अधिकारी यांनी त्या त्या ठिकाणी जावून पाहणी करून कमर्शियल कर आकारणी करावी. पाणीपट्टीची अत्यंत कमी वसूली आहे. मागिल वर्षीपेक्षा २ कोटी ने मागे आहोत. पूर्ण जबाबदारी वार्ड अभियंत्याची आहे. जास्तीत जास्त वसूली करून निधी उपलब्ध करून दयावा. अशा सूचना प्रशासनास देण्यात येत आहे.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे, स.श्री.अ.साजेद अ.सत्तार (विरोधी पक्षनेता) यांनी दिलेली यादी वार्ड कार्यालयाकडे पाठवून वार्ड अधिकारी यांनी स्थळ पाहणी करून वाणिज्य वापरासाठी मालमत्ता कर आकारणी करणेस तसेच पाणीपट्टीची थकबाकीसह वसूली वार्ड अभियंता यांनी करण्यास व जास्तीत जास्त वसूली करून निधी उपलब्ध करून देणेची कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद.